बेटी बचाओ • बेटी पढाओ

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट
द्वारा संचालित

# मातोश्री

## मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

E-mail : makm.college@gmail.com

२०२३
वार्षिकांक

## आमचे मार्गदर्शक



**श्री. पांडुरंगजी तुळसकर**

अध्यक्ष

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा.

# व्यवस्थापन समिती



डॉ. निलेश तुळसकर



श्री. पांडुरंगजी तुळसकर



प्रा. डॉ. उमेश तुळसकर



श्री. विजयराव ईटनकर





सौ. रेखा तुळसकर



श्रीमती शांताबाई तळवेकर

## विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट

(रजि. नं. महा. २०४/८५ एफ ६७० वर्धा)

### संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. पांडुरंगजी तुळसकर | अध्यक्ष |
| प्रा. डॉ. उमेश तुळसकर | सचिव |
| डॉ. निलेश तुळसकर | उपाध्यक्ष |
| श्री. विजयराव ईटनकर | सहसचिव |
| सौ. रेखाबाई तुळसकर | कोषाध्यक्ष |
| श्रीमती शांताबाई तळवेकर | सदस्या |
| प्रा.डॉ. नयना शिरभाते | सदस्या |



प्रा.डॉ. नयना शिरभाते

# * आमचे मार्गदर्शक *



**- कार्यकारी प्राचार्य -**

**डॉ. उमेश पांडुरंगजी तुळसकर**

**मराठी भाषा संवर्धन रॅली**



**मराठी साहित्य संमेलन वर्धा येथे भेट**



# मातोश्री वार्षिकांक २०२२-२३

## संपादक मंडळ

### कार्यकारी संपादक

### प्रा. अजय नामदेवराव बिरे

**सहसंपादक**

डॉ. सपना जयस्वाल

प्रा. अभय दांडेकर

प्रा. भाग्यश्री साबळे

प्रा. वैशाली तडस

प्रा. मोनीका माऊस्कर

### * विद्यार्थी संपादक मंडळ *

| | | |
|---|---|---|
| कु. आकांक्षा जयस्वाल | – | बि.एस.सी.भाग–३ |
| कु. वैष्णवी लोखंडे | – | बि.एस.सी.भाग–२ |
| कु. निर्झरा येरणे | – | बी.ए. भाग–२ |
| कु. गौरी तेलहांडे | – | बी.कॉम. भाग–१ |
| कु. धनश्री सोनवणे | – | बी.एस.सी. भाग–१ |

*** मराठी विभाग**

प्रा. भाग्यश्री साबळे

प्रा. पुनम बुरिले

*** इंग्रजी विभाग**

प्रा. अभय दांडेकर

प्रा. संगिता लांडगे

*** हिंदी विभाग**

प्रा. निलम ठवसे

*** साहित्य संकलन व संपादन**

श्री. प्रणिता आष्टणकर

प्रा. शितल कारामोरे

*** छायाचित्र मांडणी**

प्रा. दर्शना रेंडे

प्रा. सुवर्णा कान्होलीकर


*** प्रकाशक**

प्राचार्य डॉ. उमेश पांडुरंगजी तुळसकर

*** मुद्रक**

अवनी ग्राफिक्स, हिंगणघाट

*** ग्राफिक्स/अक्षरजुळणी**

श्री. प्रकाश घोडे



या वार्षिकांकामध्ये प्रकाशित झालेल्या साहित्यातील/लेखांमधील मते ही त्या लेखकांची स्वत:ची मते असून त्यांच्याशी प्रकाशक, मार्गदर्शक, वार्षिकांक समिती, संपादक मंडळ किंवा संस्था सहमत असेलच असे नाही.

– प्रकाशक


एकूण प्रति – १०००

# मनोगत...

महाविद्यालयीन घडामोडींचा शब्दरूपी वेध घेणारा 'मातोश्री' २०२२-२३ वार्षिकांक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे.

आमचे महाविद्यालय महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त असून रा.तु.म.नागपूर विद्यापीठाशी संलग्नित आहे. या महाविद्यालयाची सुरूवात जून, २०१८ मध्ये झाली. पदवी स्तरावरील कला-वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये केवळ २००-२५० विद्यार्थीनीच्या प्रवेशाने सुरू झालेल्या महाविद्यालयात आज जवळजवळ ७०० विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

आमचा उच्च गुणवत्ताधारक व आचार्य पदवी प्राप्त प्राध्यापक वर्ग कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थीनींना उत्कृष्टरित्या विद्यादान करीत आहे.

सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजना, महिला अध्ययन केंद्र, या आणि अशा अनेक शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थीनींचा सर्वांगीण विकास साधणे हेच आमचे ध्येय आहे. अनेक खेळांमध्ये विद्यार्थीनीनी विद्यापीठ व राज्यस्तरावर प्रतिनिधीत्व केले आहे.

विद्यार्थीनीच्या उत्कर्षासाठी सर्व सुविधायुक्त संगणकीय कार्यालय व ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा इ. योजनांसह विद्यार्थीनीकेंद्री शिक्षणव्यवस्था राबविण्याचा आमचा संकल्प आहे.

आधुनिक शैक्षणिक सोयीसुविधा तळागाळातील विद्यार्थीनीपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने व आमच्या संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या प्रेरणेमुळेच 'मातोश्री' सारखा अंक आपल्या हाती देता येणे शक्य झालेले आहे.

आदरणीय श्री.पांडुरंगजी तुळसकर, अध्यक्ष, विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, डॉ.निलेश तुळसकर, उपाध्यक्ष, यांचे सदैव-तत्पर मार्गदर्शन व सहकार्यामुळेच हे सर्व शक्य होत आहे. तसेच सेवेचे व्रत उराशी बाळगणारे समस्त कर्मचारीवृंद व आमच्या विद्यार्थीनी यांचेही सहकार्य मोलाचे आहे.

'मातोश्री-२०२३' या अंकात अनवधानाने काही त्रुटी आढळल्यास संपादक मंडाळाच्या निदर्शनास आणून द्याव्यात जेणेकरून पुढील अंकात त्यासंदर्भात दक्षता घेता येईल, अशी अपेक्षा करतो. शेवटी सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छांसह, धन्यवाद !

**प्राचार्य**
**डॉ. उमेश तुळसकर**
मातोश्री महिला महाविद्यालय,
हिंगणघाट, जि. वर्धा.

# संपादकीय...

माझ्या लाडक्या विद्यार्थीनींनो....

या वर्षी आपल्या महाविद्यालयात तुमच्या कलागुणांना शब्दांकित करत शब्दांना नवा आकार देत तुमच्या भावविश्वाला साकारत 'मातोश्री' वार्षिकांक प्रकाशित होत आहेत. तुमच्या कलात्मकतेचा आरसा, तुमच्या भावजीवनाचा सखासोबती, तुमच्या सर्जशीलतेचा भाष्यकार, मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालयाचा चेहरा असणारा मातोश्री अंक तुमच्यापर्यंत पोहचवताना अतिशय आनंद होत आहे. कारण विद्यार्थीनींनो मातोश्री फक्त कागदी दस्ताऐवज नाही तर तो भूत, भविष्य आणि वर्तमानाच्या संचिताचा मोठा ठेवा आहे...

तुमच्या कलात्मक जीवनाला नवा आकार मिळावा, तुमच्या आतला आवाज बाहेर यावा, तुम्ही बोलते व्हावे, लिहिते व्हावे. देशातील समकालीन प्रश्नांवर आणि सभोवतालच्या चांगल्या वाईट परिस्थितीवर तुमचं संवेदनशील मन बोलतं, लिहितं व्हावं हाच मातोश्री अंकाचा हेतू. माझा विद्यार्थी वाङ्मयीन, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक जीवनात पारंगत व्हावी यासाठीच मातोश्री अंकाची निर्मिती करणे होय..

विद्यार्थीनीच्या ललित वाङ्मयीन लेखनातून, अभ्यासपूर्ण लेखातून, काव्यातून, आणि आपल्या महाविद्यालयातील अभ्यासू, कष्टाळू प्राध्यापकांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा "मातोश्री वार्षिकांकात" लेखनरूपानं साकार झाला आहे. नक्कीच विद्यार्थीनीना यातून ऊर्मी मिळेल यात दुमत नाही.

मातोश्री वार्षिकांकाकरिता खूप मोठा मदतीचा हात देणारे आमचे मार्गदर्शक आदरणीय श्री.पांडुरंगजी तुळसकर, अध्यक्ष, विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, मा.डॉ.निलेश तुळसकर, उपाध्यक्ष, प्राचार्य डॉ.उमेश तुळसकर, यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. कारण यांच्या मायेच्या उबेशिवाय मातोश्री अंक आकार घेऊ शकला नसता.

मला आणि मातोश्री वार्षिकांकाच्या जडणघडणीत आपुलकीने मदत करणारे वार्षिकांक सामिती सदस्य प्रा. सपना जयस्वाल, प्रा.भाग्यश्री साबळे प्रा. वैशाली तडस, प्रा. मोनिका माऊस्कर आणि महाविद्यालयातील विद्यार्थीनी तसेच उत्कृष्ट टंकलेखन करणारे श्री. प्रकाश घोडे सजावट करणारे अवनी ग्राफिक्स, हिंगणघाट या सर्वांच्या सहकार्यानं मातोश्री वार्षिकांक कमीत कमी वेळेत तयार झाला. यासर्वांचे मनापासून आभार मानतो आणि माझ्या शब्दरूपी संपादकीय भाष्याला थांबवतो...

पुन्हा भेटू...

**प्रा. अजय नामदेवराव बिरे**
(मराठी विभाग)
मातोश्री महिला महाविद्यालय, हिंगणघाट, जि. वर्धा.

# प्रिय गुरूजी

सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात,
नसतात सगळीच सत्यनिष्ठ,
हे शिकेलच माझा मुलगा कधी ना कधी,
मात्र त्याला हे देखील शिकवा-जगात
प्रत्येक बदमाषगकणिक असतो एक
साधुचारित पुरूषोत्तमही, स्वार्थी
राजकारणी असतात. जगात तसे
असतात, अवघं आयुष्य समर्पित
करणारे नेतेही असतात, टपलेले वैरी
तसे जपणारे मित्रही!

मला माहीत आहे. सगळ्या गोष्टी
झटपट नाही शिकवता येत... तरीही
जमलं तर त्याच्या मनावर ठसवा, घाम
गाळून कमावलेला एकच छदाम
आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा
मौल्यवान आहे. हार कशी स्वीकारावी
ते त्याला शिकवा, आणि शिकवा
विजयाचा आनंद संयमानं घ्यायला!

तुमच्यात शक्ती असली तर त्याला
द्वेषमत्सरापासून दूर रहायला शिकवा,
शिकवा त्याला, आपला हर्ष संयमानं
व्यक्त करायला. गुंडाना भीत जाऊ
नको म्हणावं, त्यांना नमवणं सर्वांत
सोपं असतं!

जमेल तेवढं दाखवीत चला त्याला
ग्रंथभांडाराचं अद्‌भुत वैभव मात्र
त्याबरोबरच, मिळू दे त्याच्या मनाला
निवांतपणा सृष्टीचे शाश्वत सौंदर्य
अनुभवायला पाहू दे त्याला पक्ष्यांची
अस्मान भरारी... सोनेरी उन्हात
भिरभिरणारे भ्रमर... आणि हिरव्यागार
डोंगर उतारावर डुलणारी चिमुकली फुले

शाळेत त्याला हा धडा मिळू दे, फसवून
मिळालेल्या यशापेक्षा सरळ आलेले
अपयश श्रेयस्कर आहे. आपल्या
कल्पना, आपले विचार यांच्यावर
त्याला सांगा, त्यांनं भल्यांशी भलाईनं
वागावं, आणि टग्यांना अद्दल घडवावी.
त्याला हे पुरेपूर समजवा, की करावी
कमाल कमाई त्याने ताकद आणि
अक्कल विकून... पण कधीही विक्रय
करू नये हृदयाचा आणि आत्म्याचा!
धिक्कार करणाऱ्यांच्या झुंडी आल्या
तर कानाडोळा करायला शिकवा त्याला
आणि ठसवा त्याच्या मनावर सत्य व
न्यायासाठी पाय रोवून लढत रहा.

त्याला ममतेने वागवा पण लाडावून
ठेवू नका. आणि हेही त्याला सांगा,
ऐकावं जनांचं, अगदी सर्वांत... पण
गाळून घ्यावं ते सत्याच्या चाळणीतून
आणि फोलपट टाकून निकं सत्व तेवढं स्वीकारावं.

अगदी तावून सुलाखुन
निघाल्याशिवाय लोखंडाचं कणखर
पोलाद होत नसतं. त्याच्या अंगी
बनवा, अधीर व्हायचं धैर्य, अन् धरला
पाहिजे धीर त्यांन जर गाजवायचं असेल शौर्य!

आणखीही एक सांगत रहा त्याला,
आपला दृढ विश्वास पाहिजे
आपल्यावर तरच जडेल उदात्त श्रद्धा
मानवजातीवर जमलं तर त्याच्या
मनावर बिंबवा-हसत रहावं उरातलं
दुःख दाबून, आणि म्हणावं त्याला, आसू
ढाळावायची लाज वाटू देऊ नको त्याला
शिकवा. तुच्छतावाद्यांना तुच्छ
मानायला, अन् चाटुगिरीपासून सावध
रहायला. माफ करा गुरूजी! मी फार
बोलतो आहे, खूप काही मागतो आहे...
पण पहा... जमेल तेवढं अवश्य करायचं!

माझा मुलगा भलताच गोड छोकरा आहे हो तो!!!

**-अब्राहम लिंकन**

## यश

अक्षरापासून शब्द बनतात,
शब्दांपासून वाक्य,
कोंबांपासून पान बनतात,
पानांपासून झाड,

बहरलेल्या झाडासारखं
आयुष्य असं फुलावं,
या सावलीच्या वाढत्या
पावलांनी जगभर असं पसराव

क्षणाक्षणात बहराव
झाडासंगे लहराव,
या सोनेरी किररनांच्या
सुर्यासारखं चमकाव,

जगण्यासाठी जिद्द असावी
पंख नसले तरी चालेल,
जगण्यासाठी वळण असावे
रस्ता नसला तरी चालेल,

आयुष्य हा डाव असतो दोन रस्त्यांचा,
कधी असतो आदर्श श्रीरामाचा,
कधी असतो स्वार्थ श्रीकृष्णाचा

कधी त्या आदर्शमय पावित्र्याचा,
तर कधी त्या संघर्षमय पराभवाचा,
एकीकडं आनंदाचा सागर,
एकीकडं दुःखाचा डोंगर,

जगताना ही दोनीही टोकं जोडावी लागतात,
तरच तुम्ही यशाचे शिखर गाठू शकता....

**समृध्दी तांबेकर**
**बी.कॉम. भाग-३**

## आई = गीत

पुसने पाणी डोळयांमधले
घास भरवते जी ती आई
ती आई ती आई

बोल बोबडे शिकवीत सारे
जग दाखविते ती आई
ती आई ती आई

विसरून सारे मी पण सोबत
हसते रडते जी
ढेच लागता सगळयात आधी
आणि उमटते ते आई
ती आई ती आई

जखमेवरील फुंकर होतो
दयेचा ही सागर होतो.
ती आई ती आई

श्वास ही देते ध्यास ही देते
जगण्याचा विश्वास ही देते
म्हणजे जग व्यवहारी
आई कुठ काय करते
आई कुठ काय करते.....

**आस्था रेवतकर**
**बी.ए. भाग-२**

# वृक्ष



संत जनो को है ये कहना
धरती माँ का वृक्ष है गहणा।
वृक्ष लगाओ हरियाली लाओ,
इस धरती को स्वर्ग बनाओ।
पेड न काटो रखो ध्यान,
धरती का है यह परिधान।
इससे है वसुधा की शान
इससे है जीवो में जान।
वृक्ष लगाओ,
धरती को स्वर्ग बनाओ।

**पल्लीव गौळकर**
**बी.ए. भाग-२**

# आयुष्य

चेहरा असतो काही लोकांचा हसमुख,
परंतु त्यामागे लपलेले असते
खुप मोठे दुःख....

कोणाचा आनंद तर,
कोणाच्या आसवांची नदी
वाहत असते....

पण दुःखाचा हा पिंजरा,
तोडून तरी कसे जावे....

सर्व काही असुनही जवळ
तितकंच ते दर असतं...

नसतो....
आयुष्याच्या प्रत्येक क्षण तर
हिमतीनं लढून जगायचा
असतो....

प्रत्येक दुसऱ्या चेहऱ्यामागे,
एखादी गोष्ट लपलेली
असते...

कधी कधी असे वाटते,
पक्षी बनुन आकाशात उंच
उडावे...

औषधांच्या साहाय्याने,
आयुष्य जगणे सुरू असते..

दुःख संपविण्यासाठी
आयुष्य संपवणे हा पर्याय

**कु. श्रावणी भोपळे**
**बी.ए. भाग २**

## सगळं डिजीटल हे पर्यावरण पूरक आहे ?

पर्यावरण हा महत्त्वाचा मुद्दा आहे. झाडे, जंगले वाचवण्यासाठी, हवा, पाणी याचं प्रदूषण रोखण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत झाडांची तोड थांबवण्यासाठी डिजिटल व्हायचा प्रयत्न करीत आहोत. पण खरंच का डिजिटल म्हणजे ग्रीन ?कार्यालय पेपरलेस केले.कागदाचा वापर थांबवला. म्हणजे आपण पर्यावरण वाचवले, असे  सरसकटपणे म्हणता येईल का ? वैज्ञानिक दृष्टिकोणतून या प्रश्नाचा विचार करु या.

## विज्ञानवादी विचार

भीतीच्या माध्यमातून अंधश्रध्देचा होणारा जन्म हा एक सवयरुपी संस्कार होऊन बसतो.अंधश्रद्धेचे साम्राज्य दुर होण्यासाठी नव्या पिढीने विज्ञानवादी विचार स्वीकारण्याची गरज आहे.असा सल्ला महाविद्यलयाचे प्रायार्य डॉ.धनराज गोस्वामी यानी विदयार्थ्यांना दिला. शहरातील स्वामी मुक्तानंद विज्ञान महाविदयालयात विदयार्थी कल्यान मंडळ आणि सावित्रीबाई फुले पूणे विदयापीठ यांच्या सयुक्त विदयामाने अंधश्रद्धा निर्मूलन कार्यशाळा धडे दिले गेले. डॉ गोस्वामी यांनी यावेळी संत तुकाराम महाराज, संत गाडगेबाबा यांच्या गाथेतील अनेक उदाहरणे देत महाविदयालयाने विदयार्थ्यांना आपल्या जीवनात विज्ञानवाद स्वीकारण्याचेआवाहण केले.

विदयार्थी कल्याण मंडळाचे अध्यक्ष प्रा.अजय शिभुवन यांनी चंमत्कारातील विज्ञान व दैनंदिन जीवनातील अंधश्रद्धा या विषयावर आपल्या व्याख्यानातून विदयार्थ्यांना कानमंत्र दिला.प्राध्यापक डॉ.अजय विभांडिक यांनी अंधश्रद्धा व कायदा' या विषयावर व्याख्यान दिले.
२१ व्या शतकात आपले खाजगी आणि व्यावसायिक जीवन माहिती आणि तंत्रज्ञानाने पूर्ण व्यापून टाकले आहे.इंटरनेटवर घरबसल्या खरेदी करणे, रेल्वे बसची टिकिटे काढणे, सिनेमाची टिकिटे काढणे, वेगवेगळी बीले भरणे हे आपल्या अंगवळणी पडत चालले आहे. याच बरोबर फेसबुक, ट्वीटर सारख्या समाजामाध्यमांचा वाढता वापर, संगीत आणी सिनेमे अपलोड करणे, एकमेकांना पाठवणे, एकणे आणि बघणे, व्यापार आणि दळणवळणाच्या क्षेत्रावर इंटरनेटचा वाढता प्रभाव लक्षणीय आहे.



**कु. रूणाली भगत**
**बी.ए. भाग-२**

# माझी आई



आई म्हणजे देवाचे दुसरे रुप असे म्हणतात. की, देव स्वत: या जगात येऊ शकत नाही म्हणून त्याने आईला या जगात पाठविले माझी आई खूप प्रेमळ आहे. आपल्या जीवनात पहिले गुरु आई असते.जे आपल्याला लहानपणी बोट धरुन चालायला शिकवते आईची सर कोणीच करु शकत नाही."स्वामी तिन्ही जगाचे आई विना भिकारी" असे म्हटले जाते.आईची माया अगाध आहे.आपल्या सर्वाच्याच आयुष्यात आईचे महत्त्वापूर्ण असे स्थान असते व त्याबद्दल शब्दात सांगणे कठीण आहे.तिच्या संस्कारांमुळेच आपण घडतो.माझी आई सुध्दा मला घडविण्यात दिवसरात्र कष्ट घेत असते.ती रोज सकाळी लवकर उठते.देवपूजा करते.स्वंयपाक करते.घरातील प्रत्येक व्यक्तीला काय हवं असते याकडे लक्ष देते.मी कधी आजारी पडली तर ती रात्रभर जागते, व माझी काळजी घेते.माझी आई मला काय चांगले व काय वाईट या बद्दल ही सांगत असे.मी कधी रुसले तर गोड बोलुन ती मला हसवते.

मी स्वत:ला भागयवान समजते की, देवाने मला एवढी प्रेमळ आई दिली आहे. माझी आई ही खेडयात राहते इथे आमची थोडी शेती आहे.त्या शेतीमध्ये माझी आई-वडील राबत असतात. गरज असली की तर ती दुसऱ्यांच्या शेतामध्ये सुध्दा रोजंदारी करण्यासाठी जाते.माझ्या आई - वडिलांमुळे आमचे संपूर्ण कुटूंब चालते."आई" या शब्दा पासूनच आपल्या आयुष्याची सुरुवात होते.

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस,
आई म्हणजे आंगणातील पवित्र तुळस,
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी,
आई म्हणजे वाळवंटात प्यावे असे थंड पाणी.....

खरचं आई विना आपण आयुष्याची कल्पनाच करु शकत नाही. जसे वृक्ष स्वत: ऊन झेलुन इतरांना सावली देतात. तसेच आई दु:ख झेलुन आपल्याला सुखाचं जीवन देत असते. माझ्या आईबद्दल मी काय लिहू ?माझी आई माझा पहिला गुरु जीने मला चालायला, बोलायला हात धरुन लिहायला शिकविले.आणि माझे दुसरे गुरु म्हणजे माझे शिक्षक.मी शाळेत असतांनी माझ्याकडून काही चुकी झाल्यास मला समजुन सांगायचे इ. शिक्षकांशी कस वागायचं. मित्रांशी कस वागायचं हे सर्व ........ माझ्या आईने तिच्या लहानपणी खूप कष्ट केले आहेत. आणि अजुन ही करतच आहे.तिला वेगवेगळे पदार्थ तयार करता येतात. आणि तिने मला ही स्वंयपाक शिकवला आहे.माझी आई माझ्या वडिलांच्या पाठीशी नेहम भक्कमपणे उभी राहिली आणि जमेल तशी त्यांच्या व्यवसायात त्यांना मदत सुध्दा करत आली आहे.आईने सर्व नातेवाईकांना आणि शेजारधापाजाऱ्यांना आपल्या आपुलकीने आणि मयिने जोडून ठेवले आहे.

'बाबा' म्हटले की आपलं अख्ख आयुष्य...... जे आपल्या जीवनात याशाची मोठी पायरी माझा बाबा प्रेम तर खुप करते आमच्यावर पण कधी सांगत नाही.सगले जन आपल्या आई वर कविता, गीत, गोष्टी, निबंध लिहत असते.पण बाबा वर काही लिहायचं म्हटलं की खुप अवघड असते.कारण आपल्या जीवनात बाबांची एक वेगलीच जागा असते.आई इतकेच बाबा सुद्ध निर्मल व आपल्यांना न कळत खुप प्रेम आणि माया करतात. पण लहानपणपासुन आपल्याला अशी सवय लागली असते की आपल्यांना बाबांच नाव सांगितल की घाबरी वाटते.पण मी माझ्या आई - बाबा वर खूप प्रेम करते. आणि हे जर माझ्या आयुष्यात नसते तर माझ्या आयुष्याला वाव

मिळाला नसता माझे एक स्वप्न की सर्वाना असेचप्रेमळ, मायाळू, आई - बाबा असावेत जे आपल्या मुलांना कधीच एकटं न टाकणारे. माझे आई - वडील तर माझ्या आयुष्याच्या खुप मोठा हिस्सा आहे. आणि असेच नेहमी राहावे.....

**कु. भाग्यश्री रामुजी जाधव**
**बी.एस.भाग-२**

# सादियों की झलक

सर्दियों का मौसम कुछ ऐसे आया,
कोहरे से नया सबेरा जगमगाया,
मानो जैसे नई जिंदगी मिली हो,
पसंदिदा ये मौसम मैंने है पाया

इंतजार हर घडी इस मैसम का मुझे,
हर दिनों को अपणे ख्यालों में सजाया,
वह कंपकपाते दातों की टिक टिक तो,
थंड भरी हवाओं ने मुझे है उलझाया,
मासुमियत छुपी इन महीनो में, दिल से
पसंदीदा मौसम मैंने सर्दियों का पाया

सिगडी की सेक तो वह गर्मदार लिए
साथ मे चाय के प्याली का मजा कुछ एसे आई
खुबसुर्ति थंड भरी नजारों में,
मुस्कुराते फुलो से समाधान पर, सबसे
पसंदीदा मौसम मैंने सर्दियाँ ही पाई

ठंड की वर्दी सबने है पहनी, तो
सुकड सी सबकी चाल हो गई,
कोई गर्महाट की कंभल ओढे सोया तो,
नाक सबकी लाल हो गई,
कोहरे भरी रातों में सुकून की निंद,
तो चहेरे पर अलग सी चमक लहराई,
इंतजार रहा मुझे इन दिनों का क्योंकि
सर्दियों की झलक मेरे दिल में समाई

**कु. सुहानी काळे**
**बी.ए.भाग-१**

# कविता

## भारतीय संविधान आणि लोकशाही

स्वतंत्र भारताला मिळाला
संविधानरूपी मोलाचा ठेवा,
लोकशाहीचा राज्यकारभार
मार्गदर्शक तत्त्वानुरूप व्हावा...

अहोरात्र कष्टले बाबासाहेब
बनले घटनेचे खरे शिल्पकार
सहकाऱ्यांच्या मदतीने झाले
संविधान हे सत्यात साकार....

समता, बंधुता, न्याय, समानता
लोकहिताचा सर्वस्वी विचार,
समानता नि स्वातंत्र मिळता
अभिव्यक्तीलाही मुक्त संचार.....

परदेशी राज्यघटना अभ्यासून
देशहिताची तत्वे अंगिकारली,
२६ नोव्हेंबर २९४९ रोजी ही
संविधानरूपी घटना स्वीकारली....

२६ जानेवारी १९५० दिवशी
संविधानाचा अंमल हा झाला,
देशाकारभारा मिळाली दिशा
लोकशाही शब्दा अर्थ आला...



संविधानाचे जाणूनीमहत्व
संविधानाचा राखूया सन्मान,
लोकहितवादी लोकशाहीला
संविधानाचा असे अभिमान....

प्रिय असे आपले भारताचे संविधान
वैचारिक लेखनीचा लाभला बहुमान
आम्ही नागरिक भारताचे सार्वभौम महान
एकतेने सर्वधर्म नांदतात किती छान....

आदर्श मूल्ये आपली संस्कृती जगी महान
जाती, धर्म, पंथ सारे तिरगा ध्वजाचा सम्मान
वैरभाव कधी ना घडो राष्ट्रीय संपत्तीचे जतन
ऐतिहासिक वास्तूनेचे व्हावे राष्ट्र संवर्धन....

दवडीत भाकरींची चतकोर ही नसे पण,
मज पंचशील जगण्या ऊर्जा प्रदान करते,
सूर्या समान आहे ही कायदा व्यवस्था
अंधारल्या जगाला दैदिप्यमान करते...

**कु. प्रिया उरकुडकर**
**बी.ए.- भाग १**

# जिवन के सफर में.....

जिवन के सफर मे आगे बढना है
बहोत कुछ करना है,
बहोत कुछ करना है
जिवन के सफर मे आगे बढना है

पंछी बन खुले आसमान में उडना है
नदीया बनकर बहोत दुर बहते जाना है
सितारें बन आसमान में जगमगाना है
जिवन के सफर में आगे बढना है

फुलों जैसा खिलना है
मोती जैसा चमकना है
कोयल जैसे गाना है
जिवन के सफर में आगे बढना है

सुख के साथ खुशी लेते हुए
दुख के साथ संघर्ष करते हुए
परेशानी के साथ सिख लेते हुए
जिवन के सफर में आगे बढना है

**कु. संमृध्दी तांबेकर**
**बी.कॉम. भाग-२**

# चारोळी

घर जळाले तर विमा आहे

स्वप्न जळाली तर काय?

ढग बरसले तर छत्री आहे

डोळयातून अश्रु बरसले तर काय?

काटा टोचला तर काढता येतो

शब्द टोचले तर काय?

वाघ आडवा आला तर पळता येतं

अहंकार आडवा आला तर काय?

शरीर आजारी पडले तर औषध आहे.

पण मनच आजरी झाले तर काय?

त्यासाठी

एक चांगला मित्र

गोळया औषधांपेक्षा कमी नसतो.

आणि

मित्र मैत्रिणीचा गोतावळा

औषधाच्या दुकानापेक्षा कमी नसतो.

Friends Need To Be Forever

**कु. जागृती डहाके**
**बी.कॉम. भाग- २**



# मैं खाकी हूँ

दिन हूँ, रात हूँ, साँझ वाली बाती हूँ, मैं खाकी हूँ

आंधी मैं, तुफान मैं, होली मैं, रमजान मैं,
देश के सम्मान मैं, अडिग कर्तव्यों की,
अविचल परिपाटी हूँ, मैं खाकी हूँ मैं खाकी हूँ

तैयार हूँ मैं हमेशा ही, तेज धूप और बारिश,
हँस के सह जाने को, सारे त्योहार सडकों पे,
'भिड' के साथ ' मनाने' को पत्थर और गाली भी खाने को,
मैं बनी एक दूजी माटी हूँ, मैं खाकी हूँ

विहन विकट सब सह कर भी सुशोभित सज्जित भाती हूँ,
मुस्काती हूँ, इठलाती हूँ, बर्दी का गौरव पाती हूँ,
मैं खाकी हूँ

तुम में प्रकाश हूँ, कठिन वक्त की आस हूँ,
हर वक्त तुम्हारे पास हूँ, बुलाओ, मै दौडी आती हूँ, मै खाकी हूँ

भुख और थकान की बात ही क्या कभी आहत हूँ, कभी चोटिल हूँ,
और कभी तिरंगे मे लिपटी,
रोती सिसकती छाती हूँ,
मैं खाकी हूँ

**कु. मेघा तळवेकर**
**बी.कॉम. भाग- २**

## ......खुद के पर तुम्हें खुद खोलना है,

.....खुद के पर तुम्हे खुद खोलना है,
मुंजिल पाकर के वो निले आसमाँ मे तुम्हे उडना है.....
तुम्हारी जिंदगी मे तुम्हें बहुत कुछ सिखना है,
खुद की राह पर चल कर तुम्हें अपनी मंजिल पाना है,
अच्छी बुरी बातों की लहर को
तुम्हे समझना होगा,
कभी सच्ची तो कभी झुटी राह की
पहचान तुम्हे रखना होगा,
शायद कभी गिर भी जाओ तो
कभी मत रूकना तुम,
उठकर खुद को संभालते हुए
मंजिले को ओर बढना तुम,
कठिनाईयों के ढोकर खाकरं तुम
बहुत कुछ सिख जाओगे
खुद के हैसलें को बुंलद बना के
अपनी मंजिल खुद पाओगे,
कभी दुखो का समुंदर तो कभी सुखों की लहर
तुम्हे जरूर मिलेगी,
दुख मे निराश मत होना, दु:ख के बाद खुशी भी
तुम्हे जरूर मिलेगी,
फिर चाहे दु:ख होया सुख हो
तुम्हे मुस्करा के आगे बढना होगा,
किसी ओर की राह पर ना चल कर
खुद की राह पर तुम्हें चलना होगा,
तुम्हारे माता पिता का आशिर्वाद
तो हमेशा तुम्हारे साथ है,
मंजिल हासिल होने के बाद सबसे पहले
वो हि बोलेंगे "वाह-वाह क्या बात है"
इसलिऐ खुद का और माता - पिता का नाम
दुनिया मे रोशन करना तुम,
सपनो को बुलंद बना कर खुद ही,
निला आसमाँ छुं जाना तुम,
इस सें पहलें तुम्हे अपनी बुलंदी सपनों से
मंजिल की ओर आगे बढना है,
चाहे फिर पुरी दुनिया क्यो ना तुम्हे रोक के,
.......खुद के पर तुम्हें खुद खोलंना है,
मंजिल पा कर वो निले आसमाँ मे तुम्हे उडना है.......

**कु. गौरी तेलहांडे**
**बि.कॉम. भाग-२**

# भारतीय राज्यघटना

भारत देशाची राज्यघटना दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ ला लिहून स्वीकृत करण्यात आली व २६ जानेवारी १९५० ला भारतीय राज्यघटनेवर अंमलबजावणी सुरू झाली. २ वर्ष ११ महिने १७ दिवस ही प्रक्रिया जरी चालली असली तरी भारत देशात झालेल्या संविधानिक क्रांतिला १०२ वर्षाचा दिर्घ संघर्ष महापुरूषांना करावा लागला. १६१ दिवस संविधानातील कलमांचा मसुदा तयार करण्यासाठी वेळ गेला. १४४ दिवस बनवलेल्या मसुदयावर चर्चा करण्यात वेळ घालवावा लागला आणि २२ भागात ३९५ कलमा व १२ अनुसूची याप्रमाणे भारतीय संविधान निर्माण करण्यात आले. संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये भारतीय संविधानाला अपेक्षित असलेली व्यवस्था कशी असावी, संविधानाला काय अभिप्रेत आहे याबाबत उद्देशिकेमध्ये सार दिलेला आहे.

भारत देशाच्या व्यतिरिक्त अनेक देशांमध्ये सामाजिक क्रांति झाली व संविधान निर्माण करून लोकशाही व्यवस्था निर्माण करण्यात आली. अमेरिकेचे संविधान ९ कलमेचे आहे पण कालावधी ९ वर्षाचा लागला. त्याचप्रमाणे ऑस्ट्रेलियाचे सविधान ७ कलमांचे आहे व कालावधी साडे तीन वर्षाचा लागला पण भारतीय संविधान ३९५ कलमाचं असताना सुद्धा इतर देशांच्या तुलनेत खूप कमी कालावधीत जगातील सर्वात मोठं संविधान लिहिण्यात आलं पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं एक वाक्य आपल्याला विसरून चालणार नाही ते म्हणजे "संविधान कितीही महान असेल पण त्यावर योग्य अंमलबजावणी जर शासक वर्गानी केली नाही तर ते संविधान कुचकामी ठरेल." असे होऊ नये करिता संविधानप्रति जागृती असणे हे अगत्याचे आहे. कारण '१०२ वर्षाच्या संघर्षाचं फलित म्हणजे भारतीय राज्यघटना होयं; त्याचप्रमाणे आपण ज्या घरात राहतो, ज्या शेतात राबतो त्या घराची आणि शेताचा सातबारा म्हणजे संविधान होय.

भारतीय संविधानाची सुरूवात कुठून करायची यावर तब्बल अडीच तास वाद-विवाद झाला. मदनमोहन मालवीय म्हणाले की संविधानाची सुरूवात God या शब्दाने करा, अल्हारख्खा खान म्हणाले संविधानाची सुरूवात अल्हाच्या नावाने करा व के. एम. मुन्शी म्हणाले की संविधानाची सुरूवात ईश्वराच्या नावाने करा. तरीसुद्धा वाद सुटता सुटत नव्हता शेवटी बाबासाहेबांना विचारले की, सुरूवात कशी करायची त्यावर बाबासाहेब म्हणाले की, संविधानाची सुरूवात ज्याच्यासाठी आपण संविधान लिहित आहोत त्या लोकांच्याच नावाने सुरूवात व्हायला पाहिजे व त्यानंतर संविधानाची सुरूवात "We The People of India" म्हणजेच " आम्ही भारताचे लोक" याप्रकारे आम्हीच या देशाचे मालक व आजपासून आम्हालाच आमच्या वर्तमानाचा व भविष्याचा निर्णय घेण्याचा अधिकार असेल म्हणजेच

भारतीय राज्यघटनेमुळे आम्ही अधिकार संपन्न झालो ही ऐतिहासिक घटना दिनांक ९ डिसेंबर १९४६ ला प्रथम संविधान सभेत घडली ही या देशाच्या इतिहासातील सर्वात मोठी घटना होय.

राज्यघटना निर्मात्याने कलम क्र. १ मध्ये देशाचे नाव निर्धारित केले म्हणून आपण म्हणतो की, India is a Bharat. भाग २ मध्ये आम्ही भारत देशाचे नागरिक असल्याचे नागरिकत्व बहाल करण्यात आले. आणि कलम क्र. १० नागरिक या नात्याने प्रत्येक भारतीयाला नागरिक या नात्याने अधिकार बहाल केले. भाग ३ मध्ये प्रत्येक भारतीयाला मूलभूत अधिकार बहाल करण्यात आले. कलम क्र. १३ मध्ये मूलभूत अधिकारांशी असंगत असलेल्या सर्व प्रवृत्तींना शून्य घोषित करण्यात आले आणि मूलभूत अधिकराचे अल्लंघन करण्याचा अधिकार भारताच्या संसदेला सुद्धा नाही. कलम क्र. १४ समानतेचा अधिकारामध्ये कायदयासमोर सर्व नागरिक समान त्याचप्रमाणे धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या आधारावर भेदभाव केला जाणार नाही. कलम क्र. १६ समान दर्जाची संधी उपलब्ध करून देण्याची श्वाही भारतीय राज्यघटना देत आहे. कलम क्र. १७ अस्पृश्यता नष्ट करून कलम क्र. १८ नुसार कुठलाही भारतीय नागरिक विदेशी राज्याकडून उपाधी स्वीकार करणार नाही.

शोषणाविरूद्धच्या अधिकारात मानवी देहाचा क्रय-विक्रय, कलम क्र. २४. १४ वर्षाआतील बालकांना कारखाने या कुठल्याही दुकानावर काम करुन घेता योणार नाही याचे कारण की दुर्बल घटकांचा व अपरिपक्व बालकांचे शोषण होणार नाही याची दखल भारतीय राज्यघटनेने पुरेपूर घेतली आहे. कलम क्र. १९ मध्ये सर्व नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांतीपूर्वक संमेलन घेणे, संघटन बनविणे व भारताच्या राज्यक्षेत्रामध्ये सर्वत्र संचार करण्याचा अधिकार असेल त्याचप्रमाणे कलम क्र. २५ ते २८ धर्म- स्वातंत्र्य संदर्भात अल्पसंख्यांक लोकांना अधिकार सोबतच संस्कृती शिक्षा संदर्भात अधिकार कलम क्र. २९,३०,३१ नुसार अल्पसंख्यांक लोकांना बहाल केले. व हे सर्व करत असतांना काही कालसंगत बदल करण्याकरिता घटना दुरूस्तीचं प्रावधानसुद्धा करण्यात आलं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सुपूर्त केल्यानंतर पत्रकारांनी प्रश्न विचारला की, या संविधानातील काय वगळल्यास हे संविधान कुचकामी ठरेल. त्यावर बाबासाहेब म्हणाले की, संविधानाच्या भाग क्र. ४ राज्याचे नितीनिर्देशक तत्त्वे जर वगळली तर संविधान हे कुचकामी बनेल म्हणून राज्याच्या निती निर्देशक तत्त्वांवर योग्य अंमलबजावणी केली पाहिजे तेव्हाच राज्याचा विकास होईल. पर्यायाने माणूस हा राज्याची जबाबदारी असल्यामुळे ती जबाबदारी योग्यरित्या पार पाडता येईल. पुढेही जाऊन भारताच्या प्रत्येक नागरिकांची मूलभूत कर्तव्येसुद्धा असतील ज्याचे पालन करणे प्रत्येकाचं कर्तव्य असले. हे कर्तव्य मागणी करणे गांभीर्याने विचारात घेणे आवश्यक आहे.

भारतीय राज्यघटनेनी समुहांना लक्षात घेता सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाचा आधार घेऊन ओ. बी. सी. साठी कलम क्र. ३४०, एस. सी. साठी कलम क्र. ३४१, एस. टी. साठी कलम क्र. ३४२ कलमेनुसार संख्येच्या अनुपात प्रतिनिधित्व घोषित केले. भाग ९ (अ) मध्ये ग्रामसभेला व ९ (ब) मध्ये नगरपालिकांना अधिकार बहाल केले. अनुसूचित ५ आणि ६ मध्ये या देशातील आदिवासींना त्यांच्या जलजंगल जमिनीचा व तिच्या मालकीचा अधिकारासोबतच सायत्व शासनाचा अधिकार बहाल केला.

वरील माहितीनुसार असे लक्षात येते की, देशातील प्रत्येक घटकाचा, भारताचा व भारतातील पहिल्या ते शेवटल्या व्यक्तीचा विकास साध्य होईल अशी राज्यघटना अथक परिश्रमातून निर्माण करण्यात आलेली आहे.

भारतीय संविधानाचे मुख्य उद्देश्य भारतात प्रातिनिधिक लोकधाही, न्यायाची व्यवस्था बहुमतांचं शासन ज्यात जनता सार्वभौम असेल सोबतच धर्मनिरपेक्ष, समाजवादी, गणराज्यव्यवस्था निर्माण कशी करता येईल याचा पुरेपूर विचार व आखणी करण्यात आली आहे. समता, स्वतंत्रता, बंधुता व न्याय यावर आधारित समाज व राष्ट्र निर्माण करणे जे उद्देश्य महापुरूषांचे किंवा राष्ट्रपुरूषांचे होते तेच उद्देश्य भारतीय राज्यघटनेचे आहे. हे उद्देश्य लक्षात घेऊन शासन, प्रशासन, न्यायपालिका आणि प्रचार-प्रसार माध्यम हे चार आधारस्तंभ राज्यघटनेप्रति प्रामणिक राहून कार्य करतील व भारतीय लोकंसुद्धा आपले मूलभूत कर्तव्य जबाबदारीने पार पाडण्याची भुमिका घेतील तेव्हाच भारतीय राज्यघटना खऱ्या अर्थाने अंमलात येऊन भारतीय समाज व राष्ट्र प्रगत बनेल.

**कु. स्नेहा शेंडे**
**बि.कॉम. भाग - २**



फक्त वही म्हणजे शिक्षण नव्हे, तर
बुद्धीला सत्याकडे, भावनेला माणुसकीकडे
शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण
– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

जसा माणूस उपासमारीने अशक्त होऊन
अल्पायुषी होतो, तसा तो शिक्षणाअभावी
जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो.
– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# विज्ञान पर विचार

आज दुनिया पूरी तरह से विज्ञान पर निर्भर हो चुकी है, इसलिए आज के मॉडर्न युग को विज्ञान का युग कहा जाने लगा है, क्योंकि विज्ञान ने कई ऐसे चमत्कारिक अविष्कार कर चीजों को इतना आसान बना दिया है, जो कि इंसान पहले कभी सोच भी नहीं सकता था।

विज्ञान की नई तकनीको से ही अब घंटो के काम को मिनटों में करने सें सहायता मिली है। विज्ञान की बदौलत ही आज हमारा सामाजिक और आर्थिक परिवेश पूरी तरह बदल गया है। फिलहाल, विज्ञान के चमत्कार और इसकी चकाचौंध से तो पूरी दुनिया वाकिफ है, वही आज हमने इस आर्टिकल में साइंस पर कुछ ऐसे कोट्स (Science Quotes) उपलब्ध करवा रहे हैं, जिनकी सहायता से आपको न सिर्फ विज्ञान की चमत्कारिक शक्ति का पता लग सकेगा, बल्कि शक्तियों इसके अद्भुत महत्व को समझने में भी सहायता मिलेगी। "विज्ञान मानवता के लिए एक सुंदर उपहार है, हमें इस परेशान नहीं करना चाहिए।" "विज्ञान मानवता के लिए एक सुंदर उपहार है, हमें इसे परेशान नहीं करना चाहिए।"

" विज्ञान इन्सान को गरीबी और बिमारी से निकाल सकता है। और वो बदले में इन्सान सामाजिक अशांति खत्म कर सकता है। "

" राजनीति और धर्म का सभय तो अब गुजर गया है, विज्ञान और आध्यात्मिकता का सभय आ गया है। " जवाहरलाल नेहरू " एक राष्ट्र जो अपने उर्जा के स्त्रोतों को काबू में नही रख सकता है, ऐसा राष्ट्र अपना भविष्य को भी काबू नहीं कर सकता है। " बराक ओबामा

विज्ञान की बदौलत ही आज हम मिलों की दूरी मिनटों तथ कर लेते है, यहीं नही विज्ञान ने अपनी तकनीकों से कई ऐसी मशीनों का इजाह किया है, जिस्से व्यक्ती का शारीरिक श्रम भी काफी हद तक कम हो गया है और मेडिकल के क्षेत्र में तो विज्ञान के कई एसी बीमारियों का इलाज ढूंढ निकाला है, जिससे मनुष्य के दुख-दर्द कम हो गए है, वही विज्ञान ने हर क्षेत्र में एक नई क्रांति लाकर रख दी है और एक नए युग का निर्माण किया है। वहीं विज्ञान पर लिखे गए इस तरह के सुविचार से विज्ञान की शक्तियो का अंदाजा लगाया जा सकता है।

" जिवन विज्ञान के प्रयोग जैसा हैं, जितनी बार प्रयोग करोंगे पहले से बेहतर सफलता पाओंगे।" "सफलता एक विज्ञान है यदि आपकी स्थिती है, तो आप परिणाम प्राप्त करते हैं। " "अविष्कार करने के लिए, आपको एक अच्छी कल्पना और कबाड के ढेर की जरुरत होती है।" Thomasa. Edison

" हर विज्ञान दर्शन के रुप में शुरू होता है और कला के रुप में समाप्त होता है। " "विज्ञान हमें ज्ञानवान बनाता है, लेकिन दर्शन हमें बुध्दिमान बनाता है। " आज विज्ञान की खोज और चमत्कारों से हमारी जिंदगी बेहद आसान बन गई है, वहीं भविष्य को और भी अधिक सरल एवं बेहतर बनाने के लिये विज्ञान लगातार नए-नए अविष्कार कर रहा हे

वही आज दुनिया का कोई भी क्षेत्र ऐसा नही है, जहा विज्ञान का प्रभाव नहीं पडा हो औद्योगिक चिकित्सा, कृषी ,स्वास्थ शिक्षा मनोरंजन, संचार, अंतरिक्ष, इलेक्ट्रीसीटी ,पर्यटन समेत हर क्षेत्र में आज विज्ञान की चकाचौध दिखाई देती है विज्ञान की नई – नई टेक्नालॉजी ने इन क्षेत्रो में अभूतपूर्व विकास किया गया है वही विज्ञान की सहायता से ही दुनिया में आर्थिक बल मिला है फ्रिज, टिवी एसी, कार, मोबाईल, लैपटॉप, पंखा, कुलर समेत तमाम ऐसे उपकरण विज्ञान ने बनाए है जिसका मनुष्य को अपार भौतिक सुखों की प्राप्ति हुई है, वही थोडी देर भी इसके बिना रहना दूभर है। जाता है। फिलहाल, विज्ञान के अविश्वसनिय चमत्कारों को आप विज्ञान पर लिखे गए इन सुविचारों के माध्यम से समझ सकते है इंसानी दिमाग को आश्चर्य में खुशी मिलती हे, इसीलिऐ वह विज्ञान से प्रेम करता है विज्ञान बेहद तेजी से उन सवलों का जवाब हे रहा है, जो कि धर्म के प्रांत थे।" स्टीफन हॉकिंग मेरे लिए भौतिक सम्मान और गौरव के साधन कभी भी विज्ञान के क्षेत्र में प्रगति से ज्यादा नही रहे है न्युटन "विज्ञान में इतनी विभूति है की वह काल चिन्हे को भी मिटा दे।" प्रेमचद "विज्ञान हमारा घमंड कम करता है Bernard shaw "विज्ञान लोगों को गरीबी और बिमारी से निकाल सकता है।" और वो बदले में सामाजिक अशांति खत्म कर सकता है।" Stephen Hawking

"विज्ञान के चमत्कार हमारा जिवन सहज बनाते हैं पर प्रकृति चमत्कार धूप, पानी और वनस्पति के बिना तो जिवन का अस्तित्व ही संभव नही ।"

कु. ईशा ढवळे
बि.कॉम. भाग – २

आपण अनुभवू शकणारी सर्वात सुंदर गोष्ट
अनाकलनीय आहे. ती सर्व खऱ्या कला व
विज्ञानाचा स्त्रोत आहे.
– अल्बर्ट आईन्सटाईन

विज्ञान मानवतेला मिळालेली एक
सुंदर भेट आहे, आपण तीला
विकृत करू नये.
– ए.पी.जे. अब्दुल कलाम

# पर्यावरण संतुलन ही आजच्या काळाची गरज

उगवणारा प्रत्येक दिवस मानवापुढे नवनव्या समस्या निर्माण करत असतो. पण या विसाव्या शतकाच्या अखेरीस पृथ्वीपुढे जी भयावह समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे पृथ्वीपुत्र हादरून गेला आहे. मानवापुढील ही समस्या मानवानेच निर्माण केली आहे त्यानेच आपल्या पृथ्वीमातेला संकटात ढकलले आहे.

खरे पाहता मानव हे निसर्गाचेच अपत्य आहेत. निसर्गाच्या कुशीतच मानव मोठा झाला. आपला विकास साधण्यासाठी त्याने याच निसर्गाचा आधार घेतला आदर्श ठेवला. निसर्गातच त्याने आपले घरकुल निर्माण केले. उंच उंच आभाळा ला जाऊन भिडणारी वृक्षराजी पाहून माणसाचे आकाशाकडे लक्ष गेले. आभाळात स्वच्छंद भरारी मारणाऱ्या विहंगाकडे पाहून मानवालाही आकाशात विहार करावासा वाटू लागला. निसर्गाबरोबर सुखात रमलेल्या या माणसाच्या स्वार्थी वृत्तीला पंख फुटले.

स्वत:च्या बुद्धिमत्तेचा गर्व झालेला हा माणूस दूरदृष्टी न ठेवता भोवतालच्या निसर्गाचा नाश करू लागला. आणि त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला.

माणसाने आपल्या बुद्धिमत्तेने औदयोगिक क्षेत्रात खुप प्रगती केली आहे. स्वत:च्या यशाने उद्दाम झालेल्या माणसाने कारखान्यांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचा विचार केला नाही. त्यामुळे भोवतालचे वातावरण दूषित झाले.

वातावरणात सर्व नैसर्गिक संसाधने समाविष्ट आहेत. जे आपल्या सभोवताली अनेक मार्गांनी मदत करतात ते आपल्याला वाढण्यास आणि विकसित करण्यास चांगले माध्यम प्रदान करतात. या ग्रहावर आपले जीवन जगण्याची गरज असलेले सर्व काही आपल्याला देते.

थोडक्यात आपल्या वातावरणास नेहमीच कायमस्वरुपी राखून ठेवण्यासाठी, आपल्या आयुष्य नेहमी पोषण करण्यासाठी आणि आपल्या आयुष्याचा कधीही आपल्याकडून काही मदत केली पाहिजे मानव निर्मित तांत्रिक आपत्तीमुळे आपल्या पर्यावरणाचे घटक दिवसेंदिवस घटत आहेत.

पृथ्वीवरील जीवन चालू ठेवण्यासाठी आपल्या पर्यावरणाची मौलिकता टिकवून ठेवण्याची गरज आहे. संपूर्ण जगभरात आतापर्यंत आयुष्यजास्त दिवस जगणे शक्य होते.

पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छतेकडे जगभरातील सार्वजनिक जागरुकता पसरविण्यासाठी 'जागतिक पर्यावरण दिवस' ५ जून रोजी दरवर्षी साजरा केला जातो. पर्यावरणाला वाचविण्यासाठी आणि शुध्द वातावरण ठेवण्यासाठी सर्वात पहिले आपल्याला "

झाडे लावा झाडे जगवा " हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन ते आत्मसात केले पाहिजे. एका कुटुंबातून एक झाड जरी लावले तरी याचा पर्यावरणावर चांगला परिणाम होईल.

पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तिने घेतलेल्या लहान चरणासह आपण आपले पर्यावरण अतिशय सोप्या पध्दतीने वाचवू शकतो. कारखान्यातील दूषित पाणी नदी - नाले, सागर यांत सोडून दिल्यामुळे सर्वच पाणी खराब होऊ लागले. लोकसंख्या अतोनात वाढल्यामुळे माणूस स्वच्छ हवेला वंचित झाला. माणसाने निर्माण केलेल्या आणि उपभोगलेल्या विविध वस्तूंचा कचरा इतका वाढला की सुंदर वसुंधरा ओंगळ झाली. स्वत:साठी उंच इमारती उभारण्यासाठी माणसाने प्रचंड वृक्षतोड केली. निसर्गाने दिलेल्या पाण्याचा प्रचंड अपव्यय केला. मानवाला उपलब्ध असलेली निसर्ग संपत्ती हळूहळू संपु लागली आहे.पृथ्वीवरील उष्णता वाढली. पावसाचे प्रमाण घटू लागले आझोन वायूचे वातावरणातील प्रमाण घटू लागले. हवा, पाणी आणि जमीन यावरिल प्रदूषण वाढले. तेव्हा माणूस खडबडून जागा झाला व त्याने ' वसुंधर वाचवा ' ही आरोळी फोडली

पर्यावरणावरील हे संकट विशिष्ट देशापुरतेच मर्यादित नाही. कारण पर्यावरण हे सर्वांचं आहे. १९७२ साली संयुक्त राष्ट्राची मानवी पर्यावरणविषयक परिषद स्टॉकहोम येथे भरली. व १९९२ मध्ये ब्राझील मधील 'रिओ दी दी जानेरो' येथे जगातील सारी राष्ट्रे वसुधा वाचवण्याचा विचार करण्याचा विचार करण्यासाठी एकत्र आली.

शांत आणि स्वस्थ जीवन जगण्यासाठी स्वच्छ वातावरण अत्यंत आवश्यक आहे. पण आपले पर्यावरणाकडे दुर्लक्ष होत आहे. ही एक समस्या आहे. जी प्रत्येकास माहिती असणे आवश्यक आहे

आपण कचऱ्याची मात्रा कमी केली पाहिजे. कचरा टाकायच्या ठिकाणीच टाकून दयावे, पॉली पिशव्या वापरणे थांबवावे, काही जुन्या गोष्टी नवीन मार्गांनी वापरावे, दुरूस्त करावे, आणि फेकून देण्याऐवजी तुटलेल्या गोष्टींचा वापर करावे, त्यांच्या दुरुस्तीसाठी किती खर्च येईल हे पहावे. रिचार्ज करण्यायोग्य बॅटरी किंवा नुतनीकरणक्षम क्षारिय बॅटयांचा वापर करावा, फ्लोरोसेंट लाइटचा वापर करावा. पावसाचे पाणी संरक्षण, पाण्यातील कचरा कमी करावा. ऊर्जा संरक्षण, आणि विजेचा किमान वापर इत्यादी काटकसरीने केला पाहिजे.

पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे. वृक्ष, पाणी, पृथ्वी, इत्यादी पर्यावरणातील घटक आपल्या जिवनाचा भाग आहे. पर्यावरणीय घटकांचे संतुलन हे पृथ्वीच्या सभोवतालच्या वातावरणावर आणि हवामानावर परिणाम करते. निसर्गाचे पर्यावरणाशी, पर्यावरणाचे जीवनसृष्टीशी आणि त्या दोघांच मानवी जीवनाशी अतुट नातं असतं.

**कु. माहेश्वरी खोंडे**
**बि.एस. भाग- २**

## " पर्यावरण " वर निबंध

नमस्कार मित्रांनो. या लेखात आपण "पर्यावरण" वर निंबध पाहणार आहोत, तसे, आपल्या विवेकबुध्दीच्या बळावर मनुष्याने दिवसेंदिवस आपले जीवन सुखी आणि कल्याणकारी करण्यासाठी विविध प्रकारची कामगिरी केली आहे. परंतु या दिशेने जात असताना त्यांच्याकडून चूक केली की या सुखद संसाधानामुळे आणि रुंपामुळे काही घातक अगदी जीवघेण्या प्रकारांनाही जन्म दिला आहे.

पर्यावरण, ज्यातून संपूर्ण विश्व आणि सजीव जग वाढलेले आहे. म्हणजेच आपल्या आजुबाजूला जे आहे ते पर्यावरण आहे. केवळ मानवच नाही तर सर्व प्राणी, वनस्पती, नैसर्गिक वनस्पती इत्यादी पूर्णपणे पर्यावरणावर अवलंबून आहेत.

पर्यावरणाशिवाय जीवनाची कल्पना केली जाऊ शकत नाही, कारण पर्यावरण हा केवळ पुथ्वीवरील जीवनाचा आधार आहे, निरोगी जीवन जगण्यासाठी पर्यावरण आपल्याला शुध्द पाणी, शुध्द हवा, शुध्द अन्न पुरवते.

शांत आणि निरोगी जीवन जगण्यासाठी स्वच्छ वातावरण अत्यंत महत्वाचे आहे परंतु मानवांच्या काही निष्काळजीपणामुळे आपले वातावरण दिवसे दिवस गलिच्छ होत आहे. हा एक मुद्दा आहे. की प्रत्येकाने विशेषत: आपल्या मुलांबद्धल जागरुक असले पाहिजे.

### "पर्यावरणाचे रक्षण, जगाचे रक्षण!"

पर्यावरण केवळ जीवनाचा विकास आणि पालनपोषण करण्यातच मदत करत नाही. तर ते वातावरण हवामान संतुलित करण्यास मदत करते आणि हवामान चक्र राखते.

दुसरीकडे, जर आपण सरळपणे म्हणतो मानव आणि पर्यावरण एकमेकांना पूरक आहेत आणि दोन्ही पूर्णपणे एकमेकांवर अवलंबून आहेत. दुसरीकडे, जर कोणत्याही नैसर्गिक किंवा मानवनिर्मित कारणांमुळे पर्यावरणावर परिणाम होत असेल तर त्याचा थेट परिणाम आपल्या जीवनावर होतो.

पर्यावरण प्रदूषणामुळे हवामान आणि हवामान चक्रामध्ये होणारे बदल मानवी जीवनावर अनेक प्रकारे परिणाम करतात आणि या बदलामुळे मानवी जीवनाचे अस्तित्वही धोक्यात येते.

पण तरीही आजकाल लोक भौतिक सुख मिळवण्याच्या आणि विकसित होण्याच्या इच्छेत पर्यावरणाशी खेळताना चुकत नाहीत. लोभामुळे माणूस झाडे आणि झाडे कापत आहे. आणि निसर्गाशी खेळणे असे अनेक प्रकार करत आहे. ज्याचा आपल्या पर्यावरणावर वाईट परिणाम होत आहे.

दुसरीकडे जर वेळेत पर्यावरण वाचवण्यासाठी पावले उचलली गेली नाहीत तर मानवी जीवनाचे अस्तित्व धोक्यात येईल त्यामुळे पर्यावरण वाचवण्यासाठी आपण सर्वांनी मिळून योग्य ती पावले उचलली पाहिजेत. आपण जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजे आणि झाडे तोडणे पूर्णपणे थांबवले पाहिजे.

वाहने इत्यादी आधुनिक साधनांचा वापर फक्त गरजेच्या वेळी करावा कारण वाहनांमधून बाहेर पडणारा विषारी धूर केवळ पर्यावरण प्रदुषित करत नाही तर मानवी जीवनाला धोका निर्माण करत आहे. याशिवाय उदयोग कारखान्यांमधून गाळ आणि दूषित पदार्थांची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य व्यवस्था केली पाहिजे, जेणेकरून प्रदुषण पसरणार नाही.

दुसरीकडे, जर आपण या छोट्या गोंष्टींची काळजी घेतली आणि पर्यावरण स्वच्छ करण्यासाठी सहकार्य केले तरच एक निरोगी समाज बांधला जाऊ शकतो.



**कु. धनश्री सोनवणे**
**बि.एस.सी.भाग- २**

## ॥ निबंध ॥

## कोरोना एक जागतिक महामारी

जानेवारी... फेब्रुवारी... मार्च... आता फक्त दोन महिने राहिले होते आणि मग उन्हाळी सुट्टी चालू होणार होती. सुट्टीमध्ये कुठे फिरायला जायचं, कोणते खेळ खेळायचे, कोणकोणत्या मित्र मैत्रीणींना भेटायचं अशा एक ना अनेक गोष्टींची सुनियोजित यादी मनामध्ये आधीच तयार झाली होती आता वार्षिक पेपर चालू होण्यासाठी थोडेच दिवस राहिले होते आणि अभ्यासाची भरपूर तयारी सुध्दा चालू होती.

इतक्यात टीव्ही वरती एक बातमी सारखी झळकू लागली.... "जागतिक कोरोना महामारी..." भारतात कोरोनाचा शिरकाव" सुरवातील या बातमीची काहीच भाती वाटली नाही. पण थोडयाच दिवसात कोरोना रुग्णांची संख्या इतकी वाढू लागली कि सर्वत्र लॉकडाऊन जाहीर करावा लागला. सर्वजण आपआपल्या घरी बंद झाले. आमची शाळा बंद झाली, बाबांच ऑफिस बंद झाल, त्यामुळे सगळे खुप खुष झाले रोज वेगवेगळया रेसिपी तयार होऊ लागल्या कॅरम, पत्ते, बुध्दिबळाचे डाव रंग लागले. जूने फोटो खेळणी यांची शोधाशोध सुरू झाली. सुरवातीला खूप धमाल केली परंतु नंतर घरामध्ये कोंडून ठेवल्या सारखं वाटू लागलं. बाहेर मैदानातील खेळांची आठवण यायला लागली. यानंतर खूप भयानक परिस्थिती झाली. लोकांना खाऊच्या आणि रोजच्या वापराच्या वस्तू आणण्यासाठी सुध्दा बाहेर पडणं अवघड झालं. जे रोज कमाई करून खाणारे लोक होते त्यांना पोटभर अन्न मिळणे सुध्दा मुश्किल होऊन गेल पन अश्या परिस्थिती सुध्दा पोलीस लोकांच्या सुरक्षेसाठी आणि डॉक्टर लोकांच्या आरोग्यासाठी दिवसरात्र खंबीरपने कोरोनाशी लढा देत होते. स्वत:च्या आरोग्याची कोणतीच काळजी न करता जनतेच्या सेवेसाठी हे लोक गुंतून गेले होते. या अशा भंयकर परिस्थितीमध्ये कोणताही देव मदतीला नव्हता तर पोलीस कर्मचारी, डॉक्टर, नर्स सफाई, कामगार शेतकरी हे लोकचं देव बनले होते.

पंतप्रधान नरेद्रं मोदी आणि स्थानिक प्रशासन लोकांच मनोबल वाढण्याचा पूर्ण प्रयत्न करत होते. सोशल मीडिया च्या माध्यमातून काळजी घेण्यासाठी आणि लोकांची भीती घालवण्यासाठी लोकांना संबोधित करत होते. सोशल distancing आणि मास्कचा वापर सर्वांसाठी खूप महत्वाचा बनला होता. लवकरच आपण या संकटातून बाहेर पडू अशी आशा

आता सर्वांना लागली होती. जर आपण एकमेकांस सहाय्य केले तर आपण या कोरोना ला नक्की हरवू शकतो यावर माझा पक्का विश्वास बसला. अगदी आजच्या दिवसापर्यंत सुध्दा कोरोना चे संकट कोरोना महामारी अजून पूर्णपणे नाहिसे झालेले नाही. सुदेवाची बाब अशी की आता या महामारी वर लस शोधण्यास यश आलं आहे. आतापर्यंत अनेक महामारी येऊन गेल्या. डेंग्यू, चिकगुनिया प्लेग या सारख्या आजारांबदल खूप ऐकले देखील होते पण माझ्या सारख्या नव्या पिढीतील युवकांसाठी हा पहिलाच महामारीचा अनुभव आहे. चीन पासून गूढरित्या चालू झालेली ही भयंकर महामारी बघता बघता अमेरिका, ब्राझिल, इटली, फ्रांस सोबत संपूर्ण जगाला आपल्या संक्रमणात कैदच केले होते. यातून भारतही बचावला नाही. २०१९ च्या फेब्रुवारी- मार्च महिन्यात सूरू झालेली ही महामारी २०२१ सालपर्यंत पर्यंत अजूनही तशीच आहे पण गम्मत अशी कि, ज्या देशापासून सूरूवात झालेली ही कोरोना त्या देशात आता मोजकेच संक्रमित राहिले आहेत. इटली सारख्या प्रगत देशात जिथे वैद्कीय सेवा जगात अव्वल मानली जाते ती देखील या महामारीपुढे हतबल झालेली दिसून आली. हे संक्रमण रोखावे तरी कसे याचे सुरूवातीला कोणत्याच सरकारला कल्पना नव्हती, यावरील औषधे तर खूप दूरचा विचार होता. भारताने देखील कोरोनाच्या पहिल्या लाटेत वेळेत लॉकडाऊन लावल्याने अनेक समस्या टाळता आल्या. पण त्या ताळेबंद मूळे परराज्यातील मजुरांचे खूप हाल झाले. काही लोकांनी मिळेल त्या वाहनांनी आपली घरे गाठली तर काहिजण वाहना अभावी चालत उन्हाची पर्वा न करता आपले घर गाठले काही काळानंतर मोबाईल वर शाळेचे तास सुरू झाले पण काही गरीब मुलांकडे मोबाईल इंटरनेट अशी साधनेही नव्हती सरकारने बऱ्यापैकी मदत केली. लोकांना विनामूल्य रेशन देणे काहींच्या बॅकेमध्ये पैसे टाकणे विनामूल्य उपचार अशा योजना राबवल्या. आता जग थोडे सावरत आहे. या महामारीमधून जग पटरीवर येत आहे. पण हे सगळ कधी संपते काय माहीत. आपण स्वत:ला काही नियम घालून घेतले, जीवनशैली थोडया प्रमाणात बदलली तर नक्कीच आपण इथूनपुढे अशा संकटाना तोंड देण्यासाठी सक्षम होऊ.

कु. अनन्या धोटे
बि.एस.सी- भाग २

# एस. टी. बसचे आत्मवृत्त

मला बोलू द्या. माझा आवाज बंद करू नका. कारण मी आता शेवटचे क्षण मोजत आहे. आज सकाळचे ते भीषण क्षण मी विसरु शकत नाही. असा कोणता गुन्हा मी केला होता की मला हे एवढे शासन झाले! खरच सांगते. अहो, मला अजुन जगायचे होते. पण या आडदांड जगाने मला राम म्हणण्याची वेळ आणली हो! पुढे एस. टी. बस म्हणाली. "तसे माझे वय काही फार झाले नव्हते माझा जन्म होऊन पुरती पाच वर्षेही झाली नाहीत. हा जन्म, हे रुप घेण्यासाठीही मला अतोनात कष्ट साहावे लागले. लोखंडी घणाचे प्रहार व धगधगत्या अग्नीचे चटके: सारे मी सहन केले. कशासाठी? केवळ तुमच्यासाठी माझ्या लालचुटुक रंगावर मी खुष होते. रस्ता तेथे एस, टी: हेच मुळी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे ब्रीदवाक्य. त्यामुळे या लहानशा आयुष्यातही मी महाराष्ट्राचा कानाकोपरा धुंडाळला. गुळगुळीत डांबरी रस्त्यावरुन धावते. खडबडीत दगडी रस्ते पार केले, उंच सरळ चढण चढले आणि तेवढीच उतरलेही. अनेक घाटांतून अवघड वळणे घेत घेत आयुष्य काढले.

"हे सारे मी कोणासाठी करीत होते? तर माझ्या गरीब देशंबांधवासाठी. श्रीमंतांजवळ स्वत:ची वाहने असतात. मनात आले की ते केव्हाही काठेही जाऊ शकतात. पण खेडोपाडी राहणारे अनेक गरीब लोक असतात. त्यांच्या प्रवासाची चिंता कोणी करावी? लक्षावधी माणसांची सेवा करावी हेच माझे जीवनध्येय होते. एकदा एक गरीब खेडुत दुसऱ्या एका प्रवाशाला म्हणत होता, 'अरे आपण कुठे गरीब आहोत ही दोन-अडीचा लाखांची लाल एस. टी. आपलीच नव्हे का!' तेव्हा मला अगदी धन्य धन्य वाटलं. मी आणि माझ्या इतर शेकडो भगिनी महाराष्ट्राच्या खेडोपाडी जाऊन पोहोचलो. त्यामुळे खेडयांचा विकास होऊ लागला. ज्या खेडयांचा बाहेरच्या जगाशी संबंधच येत नव्हता ती मागासलेली होती. तेथील मलाला बाजारपेठ दिसत नव्हती. हे सारे प्रश्न आमच्यामुळे सुटले. आपल्यामुळे माणसाचे जीवन सुसहय होत आहे हे पाहून आनंद वाटला.

"त्यावेळीही एक गोष्ट मनाला डाचत होती. हे प्रवासी इकडे तोंडाने 'आमची गाडी' म्हणयचे, पण गाडीची स्वच्छता ठेवायचा प्रयत्न करायचे नाहीत. एस. टी. आपलीच म्हणून जेथे बसायचे तेथेच घाण करायचे सकाळी छानपैकी न्हाऊन माखून आलेल्या माझे रात्रीपर्यंत रुप पाहण्यासारखे व्हायचे. शेगांची टरफले, केळयांच्या साली अशी गलिच्छ आभूषणे मला नित्य बहाल केली जायची. माझा उपयोग करणारे लोक माझी खुशाल मोडतोड करायचे.

कुठलाही संघर्ष, संप उभा राहिला की आमच्यावर दगडांचा मारा. कधी कधी जाळपोळही सहन करावी लागे. मला चालविणारे चालकही अनेक. काही काही इतक्या निर्दयपणे माझ्याशी वागणूक करीत की, त्यामुळे माझी गात्रेच खिळखिळी होत. देखभाल, तेलपाणी यांबाबत तर निराशाच होती. तरी 'सेवा हाच माझा धर्म' असल्याने वर्षातील तीनशे दिवस तरी मी रस्स्यावर धावत असे"

"आज हाच रस्ता माझी मृत्युभूमी ठरला. मी रोजच्याप्रमाणे धावत होते. चालकही चांगला होता. उत्कृष्ट कामगिरीसाठी त्याला बक्षीस मिळाले होते. पण एका बेजबाबदार ट्रकचालकाने आपला रस्ता सोडला आणि तो सरळ माझ्या अंगावरच चालून आला. माझे तुकडे तुकडे झाले दोन्ही गाडयांचे चालक आणि कित्येक प्रवासी मृत्युमुखी पडले. कोणत्याही दुरुस्तीपलीकडे मी आता आहे. या क्षणी मला एकच प्रश्न ग्रासतो आहे, यात माझी चूक कोणती? माझ्या सेवाव्रताला हेच फळ का? कोन देईल माझ्या या प्रश्नांची उत्तरे?

**कु. तेजस्वीनी देहारी**
**बि.ए. भाग- ३**

An Autobiography is a life
story. It Starts when you're
born and continues until the end
- Richard Hell

An Autobiography is not about picturers,
it's about the stories, it's about honesty and
as much truth as you can tell without coming
too close to other people's privacy.
- Boris Becker

# या भारतात बंधुभाव नित्य वसू दे



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे

नांदोत सुखे गरीब–अमीर एक मतांनी
मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी
स्वातंत्र्य–सुखा या सकलांमाजि वसू दे
दे वरचि असा दे

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना
हो सर्व स्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना
उद्योगी तरूण शीलवान येथे असू दे
दे वरचि असा दे

जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी
खलनिंदका मनीही सत्य न्याय वसू दे
दे वरचि असा दे

सौंदर्य रमो घराघरात स्वर्गीयापरी
ही नष्ट होऊ दे विपत्ती भीती बावरी
तुकड्यास सदा या सेवेमाजी वसू दे
दे वरचि असा दे

**– संत तुकडोजी महाराज**

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

## महाविद्यालय विकास समिती २०१९-२०

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६
या कायद्यातील कलम ९७ (१) च्या
अंतर्गत महाविद्यालयीन समिती

| | |
|---|---|
| १) श्री. पांडूरंगजी तुळसकर - | पदसिध्द अध्यक्ष |
| २) श्री.विजयराव इटनकर - | व्य.स.निर्देशीत सदस्य |
| ३) प्रा. सपना जयस्वाल - | निर्देशीत विभाग प्रमुख |
| ४) प्रा. अभय दांडेकर | अध्यापक सदस्य |
| ५) प्रा. वैशाली तडस - | अध्यापक सदस्य |
| ६) प्रा. अजय बिरे - | अध्यापक सदस्य |
| ७) श्री. अमित रेंढे - | अध्यापकेत्तर सदस्य |
| ८) प्रा.डॉ. नयना शिरभाते - | अध्यापक सदस्य |
| ९) श्री. प्रभाकरजी आंबटकर- | अध्यापक सदस्य |
| १०) प्रा.डॉ. राजविलास कारमोरे- | संशोधन सदस्य |
| ११) कु. तेजस्विनी देहारी | समाजसेवी-मा.वि.सदस्य |
| १२) प्रा. मोनाली गिरडे - | स.अं.गु.हमी समिती |
| १३) प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर - | सदस्य सचिव |

महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे सभापती व सचिव
(विद्यार्थांच्या निवडीनुसार सदस्य घेण्यात येईल)


श्री. पांडुरंगजी तुळसकर


प्रा.डॉ.आर.आर. कारमोरे


प्रा. अभय दांडेकर


श्री. अमित रेंढे


श्री. विजयराव ईटनकर


प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर


प्रा. डॉ. नयना शिरभाते


प्रा. सपना जयस्वाल


श्री. प्रभाकर आंबटकर


प्रा. अजय बिरे


प्रा. वैशाली तडस


कु. तेजस्वीनी देहारी

# ✻ महाविद्यालयातील विविध कार्यक्रमाची छायाचित्रे ✻





















''हिंगणघाट क्षेत्रातील मुलींना शिक्षणाच्या
प्रवाहात आणून तळागाळापर्यंत
उच्च शिक्षणाची गंगोत्री पोहचवून
महिला सक्षमिकरणाच्या दिशेने टाकलेले
पाऊल पुर्णत्वास जाण्याचा संकल्प आणि
त्याच उद्देशाने प्रेरीत होवून केलेला
हा यशस्वी प्रयत्न'

....... पांडुरंग तुळसकर

## मातोश्री कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयीन विविध शाखा

**कला शाखा**
(B.A.)
(मराठी माध्यम)
प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष

**वाणिज्य शाखा**
(B.Com)
(इंग्रजी माध्यम)
प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष

**विज्ञान शाखा**
(B.Sc.)
प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष

### संस्थेद्वारे चालविण्यात येणारे विविध शाळा व महाविद्यालय -

- विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर
- विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, समुद्रपूर
- विद्या विकास उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम, समुद्रपूर
- विद्या विकास प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, हिंगणघाट
- विद्या विकास हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, हिंगणघाट
- मातोश्री कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट